# 'नटसम्राट' एक असामान्य चित्रपट!

**- विजया मराठे** (पमोना कॅलिफोर्निया)



नुकताच 'नटसम्राट' हा चित्रपट बघितला,ओळखीच्या विषयाची अनोखी कलाकृती! मनावर बिम्बणारा, विचारांना चालना देणारा एक अद्‌भूत अनुभव! पाणावलेल्या डोळ्यांनी अन् भारावलेल्या मनांनी आम्ही चित्रपटगृह सोडले. विचारांचे वादळ चालूच होते. नाना पाटेकरांचा उत्कृष्ट अभिनय हे या सिनेमाचे वैशिष्ट्य होते हे निश्चित. त्यांच्या भूमिकेला अनेक पैलू होते. नाटकांवर, अभिनयावर अतिशय प्रेम करणारा एक उत्तम नट कुटुंबावर प्रेम करणारा व मुलांवर विश्वास ठेउन भोळसटपणे आपले घर, पैसे देऊन टाकणारा एक बाप, दारूचे व्यसन लागलेला एक व्यसनी माणूस, नातीबरोबर लहान होऊन तिच्याबरोबर रमणारा, मित्रावर नितांत प्रेम करणारा, बायकोला मानाने वागवून तिच्याशी मिश्किलपणे वागणारा, अन् सगळ्यात महत्वाचे म्हणजे अतिशय मानी असलेला एक माणुस. हे सगळे अभिनयाचे पैलू त्यांनी अगदी सहजतेने पार पाडले. माझ्या मते हा सिनेमा यशस्वी होण्याचे बरेचसे रहस्य त्याचं कथानक व पटकथा, संवाद यात आहे. कुसुमाग्रजांची कथा, किरण यज्ञोपवित, अभिजित देशपांडे व महेश मांजरेकर यांचे संवाद याबद्दल त्यांना त्रिवार वन्दन. या कथानकाचं वैशिष्ट्य म्हणजे यातील काही माणसे वागायला चुकली, तरी त्यांच्यातले गुणही दाखवले आहेत. विशेषतः त्यांच्या मुलीचे व नटसम्राट यांचे सगळेच बरोबर होते हे दाखवले नाही .त्यांची दोन्ही मुलं आहे ती परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांच्या मतांनी निर्णय घेत असतात. पण या निर्णयांनी मोठ्या माणसांची मने दुखावली जाताहेत याचा विचार ते करत नाहीत. सर्व माणसांना एकमेकांना समजून घेण्याची पात्रता नसते, आणि आहे त्या परीस्थितीत जुळवून घेण्याची क्षमता नसते हाच बोध आहे. शिवाय आपले घर व पैसाअडका आपल्याकडे शेवटपर्यंत बाळगावा असेही यात सुचवलेले आहे. अनेक विचार नकळत मनात येतात. शिव्या या क्वचित प्रेमाने वापरल्या जात असल्या किंवा लावणी हे लोकनृत्य एक उत्तम कलाकृती असली, तरी नऊ दहा वर्षाच्या मुलीला शिकवणे योग्य आहे का? पण फक्त यासाठी वेगळे होण्याचा निर्णय घेणे योग्य आहे का? आणि सून म्हणत होती, की ते दुसरीकडे जातील, तर नातीच्या सोयीसाठी किंवा आपल्या मानीपणाने घर सोडणे योग्य होते का? मुलीने आपल्या आईवडिलांवर पैसे घेतल्याचा आरोप करणं अतिशय चुकीचे होते, पण आपली बायको आजारी असताना भर पावसात निघून जाणं योग्य असतं का? सर्वात अभिमान श्रेष्ठ ठरतो. आपली अडगळ होते आहे अशा परिस्थितीत जगण्यापेक्षा मानाने जगणेच श्रेष्ठ ठरते. या संबंधीचे म्हाताऱ्या नवराबायकोंचे संवाद खूप छान आहेत. शिवाय स्वतःच्या मुलांपेक्षा समजूतदार जावई, राजा बुटपॉलिशवाला, चहा देणारी बाई यांचे प्रेम श्रेष्ठ ठरते. शेवटी हा कलाकार कोणाहीकडे राहायला न जाता त्याच्या आवडीच्या रंगभूमीवर मानाने प्राण सोडतो, हा शेवट मनाला भिडतो .खूप आवडतो. प्रेक्षकांच्या मनात सिनेमाविषेयी अनेक विचार तरंगणे हीच कथानक चांगले असण्याची खूण आहे.

कथानक जरी चांगले असले, तरी त्याला जिवंत करण्याचे काम कलाकार करतात. नाना पाटेकर यांचे काम उत्तम झाले आहे हे निर्विवाद, पण या सिनेमात सर्वच कलाकार त्यांच्या भूमिकेत समरस झाले आहेत. बुळचट

मुलगा, फक्त आपल्या कुटुंबाचा विचार करणारी सून, स्वतःलाच सर्व समजतंय असं वाटणारी मुलगी, नवऱ्याशी एकनिष्ठ असलेली बायको, समजूतदार जावई, नाट्यावर प्रेम असलेला पण यशस्वी न झालेला मित्र, इमानेइतबारे काळजी घेणारा राजा, विठ्ठल सर्वांचीच कामे जिवंत वाटतात.

पदोपदी मांजरेकरांच्या उत्कृष्ट दिग्दर्शनाची प्रचिती येते. पण प्रसिद्ध नट गणपतराव एकटे रस्त्याच्या कडेला बसले असताना त्यांच्यासारखाच रस्त्यावर भटकणारा कुत्रा त्यांच्या जवळ येतो, व म्हातारा-म्हातारी रात्री पावसांत निघून जात असतात, त्यावेळी गडी विठ्ठल त्यांना पाहतो पण अडवत नाही; कारण त्यानेही अपमान सोसलेला असतो, तो फक्त नमस्कार करतो ही दृश्ये मनाला भिडतात.

या चित्रपटाला व त्याच्याशी निगडीत असलेल्या सर्व मंडळींना त्रिवार नमस्कार.

***